महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे,
कस्तुरी इमारत, तळ मजला,
पेट्रोलियम हाऊस समोर, ज.द.मार्ग, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
दूरध्वनी क्रमांक:०२२- २२८८०१०६/१७ ईमेल : ao.transfer2024@mahakosh.in संकेतस्थळ:www.mahakosh.gov.in

वाचा :-
१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दि.०८.०६.१९९५
२. शासन निर्णय वित्त विभाग क्र.११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३,दि.२०.०७.२००१
३. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन-२००२/प्र.क्र.१/सेवा-३,दि.११.०१.२००२
४. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४३/सेवा-३,दि.३१.०८.२००९
५. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४४/९९/सेवा-३,दि.०१.०४.२०१०
६. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा-३,दि.०१.०७.२०११
७. शासन निर्णय क्र.वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१२/प्र.क्र.७१/सेवा-३,दि.१९.०१.२०१३
८. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-११११/प्र.क्र.८/सेवा-३,दि.०९.१२.२०१६
९. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३ दि.२३.१२.२०१५
१०. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-११११/प्र.क्र.०८/सेवा-३ दि.११.०५.२०१७
११. शासन निर्णय,वित्त विभाग,क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३ दि.०२.०३.२०१९
१२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन-१२, दि.०१.०८.२०१९
१३. शासन वित्त विभाग आदेश क्र. सेवाप्र २०२०/प्र.क्र.८९/कोषा प्रशा-३ दि.१९.०६.२०२५

क्र.संलेको २०२६/प्रशा-राप/सुसेआप्रयो/ले.अ./ 237 दिनांक :- 12 FEB 2026

## -: आदेश :-

**विषय :** राज्य शासकीय अधिकारी यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय करणेबाबत.

सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार शासकीय कर्मचारी / अधिकाऱ्यांना १०,२० व ३० वर्षांच्या नियमित सेवेनंतरची तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना वित्त विभागाच्या दि.०२.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.०१.०१.२०१६ पासून अनुज्ञेय करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयामधील नमूद तरतूदीनुसार, सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यंत वेतन घेणाऱ्या (सहाव्या वेतन आयोगातील पे बँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड पे रु.५४००/- या सुधारीवेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचारी /अधिकाऱ्यांना लागू राहील. संबंधित कर्मचारी/अधिकारी हे कोणत्याही कारणामुळे वेतनस्तर एस-२१ मध्ये वेतन आहरीत करु लागतील, तेव्हा त्यांना उपरोक्त नवीन योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

वित्त विभाग शासन निर्णय दि.०२.०३.२०१९ योजनेचा तपशील (xiv) नुसार, ज्या कर्मचारी/ अधिकारी यांना कालबद्ध पदोन्नती/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना/सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, यांचा यथास्थिती पहिला व दुसरा लाभ हा दि.३१.१२.२०१५ पूर्वी प्राप्त होऊन ते दि.०१.०१.२०१६ रोजी वा नंतरच्या तारखेस सेवानिवृत्त झाले आहेत/ मृत्यू पावले आहेत, अशा कर्मचारी/अधिकारी यांच्या लाभाच्या तारखेपासून यथास्थिती ८ वर्षाची सेवा तसेच ६ वर्षांची सेवा ही त्यांच्या निवृतीच्या तारखेस / मृत्यूच्या तारखेस पूर्ण होत आहे, अशा कर्मचारी/अधिकारी यांना अनुज्ञेयतेनुसार व पात्रतेनुसार यथास्थिती दुसरा वा तिसरा लाभ अनुज्ञेय करण्यात आला आहे.

त्यानुसार तपासणी करुन महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा अंतर्गत लेखा अधिकारी संवर्गातील श्रीम.शमीनाबानो मोहंमद शरीफ़ शेख, सेवानिवृत्त लेखा अधिकारी यांना तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत सहायक संचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ हा शासकीय सेवेतील तिसरा लाभ म्हणून त्यांच्या नावासमोर स्तंभ-७ मध्ये नमूद केलेल्या दिनांकापासून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

| अधिकाऱ्यांचे नांव | शासकीय सेवेतील प्रथम नियुक्ती | जि.प.जि.तां.से. वर्ग ३ (लेखा) सहायक लेखा अधिकारी पदोन्नती | आश्वासित प्रगती योजनेंतर्गत लाभ मिळाल्याचा दिनांक | म.वि.व ले.से. लेखा अधिकारी संवर्गात पदोन्नतीचा दिनांक | म.वि.व ले.से. वर्ग-१ परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाल्याचा दिनांक व आदेश दिनांक | तीन लाभांच्या योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| श्रीम.शमीनाबानो मोहंमद शरीफ़ शेख (सेवानिवृत्ती दि.३०-०६-२०१८) | दि.०४-०९-१९८६ उपलेखापाल | दि.०१-११-१९९६ (पहिला लाभ) | दि.२९-१०-२००८ लेखा अधिकारी संवर्गाची वरिष्ठ वेतनश्रेणी (दुसरा लाभ) | दि.०४-०२-२०१० | दि.०४-०२-२०१३ पासून सूट आदेश दि.१९.०६.२०२५ | दि.०१-११-२०१६ सहायक संचालक संवर्गाची वरिष्ठ वेतनश्रेणी (तिसरा लाभ) |

अटी व शर्ती :

१. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि.०८.०६.१९९५ मधील अट क्र.२ (मा) : या योजनेंतर्गत अनुज्ञेय करण्यात आलेल्या लाभामुळे संबंधित अधिकाऱ्यांच्या जबाबदारी व कर्तव्यांमध्ये वाढ होत नसली तरी नियमित पदोन्नतीप्रमाणे पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेत वेतन निश्चितीचा लाभ मिळेल. या योजनेतंर्गत वरिष्ठ वेतन संरचना दिल्यानंतर वेतन निश्चिती नियमित पदोन्नतीप्रमाणे होईल मात्र त्याच वेतन संरचनेत नियमित/ कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा वेतन निश्चितीचा लाभ देय होणार नाही.

२. शासन निर्णय वित्त विभाग दि.००२.०३.२०१९ मधील अट क्र.(xx) (३) : या योजनेतंर्गत पहिला, दुसरा व तिसरा अथवा तिन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या अधिकाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, तथापि अशा लाभांची वसूली करण्यात येणार नाही. तसेच असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधितांची वेतननिश्चिती ही त्यांना जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम १२ च्या तरतूदीनुसार करण्यात येईल.

३. शासन निर्णय वित्त विभाग दि.०२.०३.२०१९ मधील अट क्र.(xx) (२) : कार्यात्मक पदोन्नती नाकारली आहे अशा अथवा कार्यात्मक पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचारी/अधिकारी यास भविष्यात होणा-या/झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत, कार्यात्मक पदोन्नतीस पात्र ठरल्यास त्यास कार्यात्मक पदोन्नतीचा कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून १० वर्षाच्या नियमित सेवेनंतर, अन्य विहित अटी व शर्तीच्या पुर्ततेनंतर, या योजनेंतर्गत यथास्थिती पहिला/दुसरा/तिसरा लाभ पात्रतेनुसार मंजूर करण्यात येईल.

४. या आदेशान्वये तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यांत आलेल्या अधिकाऱ्यांनी शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक.पीएवाय-१०८२/सीआर/११००/(एक)/एसईआर-३, दिनांक ०६.११.१९८४ व वित्त विभाग, शासन परिपत्रक वेपूर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९ दि.२०.०२.२०१९ नुसार वेतननिश्चितीचा विकल्प द्यावयचा असल्यास तो त्यांनी हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत संबंधित कार्यालय प्रमुखांकडे सादर करावा.

५. संबंधित कार्यालय प्रमुखांनी वरील अधिकाऱ्यांची पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेतील वेतननिश्चिती त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार करून त्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून एस-२० वेतनस्तरामध्ये देण्यांत यावा.

६. उपरोक्त नमूद सेवानिवृत्त लेखा अधिकारी हे नियमित निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन घेत असल्याची खात्री करूनच वेतननिश्चिती व थकबाकी संदर्भात पुढील कार्यवाही करण्यात यावी.

७. सदरचे आदेश संचालनालयाच्या https: mahakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांच्या वेतननिश्चितीसाठी कार्यालय प्रमुख यांनी संकेतस्थळावरील प्रत ग्राहय धरावी.

(दीपा देशपांडे)
संचालक
लेखा व कोषागरे.
महाराष्ट्र राज्य. मुंबई.

प्रत :. १. सहसचिव,वित्त विभाग,मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ०३२
२. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
३. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, नाशिक
४. संबधित अधिकारी यांना त्यांचे कार्यालय प्रमुखांमार्फत.
५ . संबधित अधिकारी यांची वैयक्तिक नस्ती.
६. निवड नस्ती.